आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२ जानेवारी २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महानगरपालिका निवडणुकीसाठी माघारीची मुदत समाप्त, अनेक ठिकाणी उमेदवारांच्या बिनविरोध निवडी निश्चित

- ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं ज्येष्ठ लेखिका डॉ.मृदुला गर्ग यांच्या हस्ते सातारा इथं उद्घाटन

- मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी पालघर इथल्या बोगद्याचा  ब्रेकथ्रू संपन्न

- महाराष्ट्रासह ८ राज्यात सेमीकंडक्टर प्रकल्पाचे २२ प्रस्ताव मंजूर

आणि

- मराठी विज्ञान परिषदेचे जीवन गौरव पुरस्कार यंदा डॉ. टेस्सी थॉमस आणि डॉ. गगनदीप कांग यांना जाहीर

<><><><><>

महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागं घेण्याची मुदत आज संपली. आता ठिकठिकाणच्या लढतींचं चित्र स्पष्ट होईल. अनेक ठिकाणी  उमेदवारांना प्रतिस्पर्धी न उरल्यानं त्यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. अनेक ठिकाणी मुळातच एकमेव अर्ज आले होते, तर काही ठिकाणी छाननीत इतर अर्ज बाद झाल्यानं उमेदवार बिनविरोध आहेत. उद्या निवडणूक चिन्हाचं वाटप झाल्यानंतर अंतिम उमेदवार यादी जाहीर होईल.

दरम्यान, काही ठिकाणचे अर्ज बाद झाल्यानं काही उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. मालेगाव महानगरपालिकेत प्रभाग सहा मध्ये प्रतिस्पर्धी पक्षांचे उमेदवारी अर्ज बाद झाल्याने इस्लाम पार्टीच्या उमेदवार मुनीरा शेख या बिनविरोध निवडून आल्या. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत शिवसेनेचे तीन आणि भाजपाचा एक उमेदवार बिनविरोध निवडून येणार हे स्पष्ट झालं आहे. त्यामुळे या महानगरपालिकेत बिनविरोध निवडून येणाऱ्या उमेदवरांची संख्या आता आठ झाली आहे.

जळगाव महानगरपालिकेतल्या प्रतिस्पर्धी उमेदवारांचे अर्ज बाद ठरल्याने प्रभाग क्रमांक १२ ब मधल्या भाजप उमेदवार उज्ज्वला बेंडाळे यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.

धुळे महानगरपालिकेत प्रभाग क्रमांक १७ ब मध्ये दोन अपक्ष उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने भाजपच्या उमेदवार सुरेखा उगले यांची बिनविरोध निवड निश्चित आहे. याआधीच दोन उमेदवार बिनविरोध निवडले गेल्यामुळे धुळ्यातून भाजपच्या तीन उमेदवारांची बिनविरोध निवड होत आहे.

येत्या 15 तारखेला मतदान तर 16 तारखेला मतमोजणी होणार आहे.

<><><><><>

महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रशासनही सज्ज होत आहे.
मुंबई महापालिकेनं वॉर्डनिहाय मतदान केंद्रांची यादी काल प्रसिद्ध केली. या निवडणुकीसाठी एकूण १० हजार २३१ मतदान केंद्र उभारली जातील. त्यातली ४ हजार ३८६ सरकारी आणि निम- सरकारी इमारतींमध्ये असून ५ हजार १४३ खासगी इमारतींमध्ये आहेत, अशी माहिती पालिकेनं दिली आहे. ७०२ मतदान केंद्र गृहनिर्माण सोसायट्यांच्या आवारात असणार आहेत.  सर्व मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांगासाठी विशेष सोयी सुविधा पुरवल्या जाणार आहेत.

ही निवडणूक निर्भय, मुक्त, पारदर्शक आणि शिस्तबद्ध वातावरणात व्हावी, यासाठी सर्व यंत्रणांनी राज्य निवडणूक आयोगानं दिलेल्या आदर्श आचारसंहितेचं काटेकोर पालन करावं, अशा सूचना पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिल्या आहेत. निवडणुकांच्या संदर्भात पालिका, पोलीस, रिझर्व्ह बँक, सुरक्षा दल आणि इतर विभागाच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. निवडणूकपूर्व तयारी, कायदा आणि सुव्यवस्था, आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन, विविध भरारी पथकांचे कार्य, संशयास्पद आणि मोठ्या रकमेच्या व्यवहारांवर लक्ष ठेवण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

<><><><><>

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांची निवडणूक फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोग या निवडणुकीचं वेळापत्रक जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात जाहीर करण्याची शक्यता आहे.

या संदर्भात या जिल्ह्यांमधल्या अधिकाऱ्यांची बैठक येत्या ६ तारखेला होणार असून यावेळी निवडणुकीच्या तयारीबद्दल विशेष आढावा घेतला जाईल.

या निवडणुकीसाठी नवीन मतदान यंत्रांची गरज असून १५ जानेवारीनंतर या यंत्रांचा पुरवठा अपेक्षित असल्याचं आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

<><><><><>

९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं औपचारिक उद्घाटन आज सातारा इथं ज्येष्ठ हिंदी साहित्यिक डॉ. मृदुला गर्ग यांच्या हस्ते झालं. दलित साहित्य हा मराठी साहित्यविश्वाचा आत्मा असल्याची भावना त्यांनी उद्घाटनपर भाषणात व्यक्त केली. संमेलनाच्या अध्यक्षपदाची सूत्रं ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांनी मावळत्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांच्याकडून स्वीकारली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि इतर अनेक मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

पहिलीपासून हिंदी किंवा अन्य भारतीय भाषा शिकवण्याच्या निर्णयाला साहित्यिक जगताचा विरोध असल्याची भूमिका, मावळत्या अध्यक्ष तारा भवाळकर यांनी तसंच अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सचिव मिलिंद जोशी यांनी मांडली, अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठीला पुरेसा निधी मिळावा अशी मागणी त्यांनी मांडली.

नाशिकच्या तपोवनातल्या वृक्षतोडीबद्दल भवाळकर यांनी चिंता व्यक्त केली.

हिंदी भाषेच्या अध्यापनाबद्दल नरेंद्र जाधव समिती नेमली असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं.

समृद्ध ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या मराठी साहित्याचं भवितव्य उज्ज्वल आहे, असा विश्वास नवे संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.

<><><><><>

मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेन च्या माध्यमातून मध्यमवर्गीयांना परवडणाऱ्या दरात प्रवास करण्याची सुविधा मिळेल असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. बुलेट ट्रेनसाठी राज्यातल्या दुसऱ्या बोगद्याच्या पालघर जिल्ह्यातल्या ब्रेकथ्रू समारंभाला ते आज दूरस्थ पद्धतीने उपस्थित होते. हा दीड किलोमीटर लांबीचा बोगदा विरार ते बोईसर स्थानकांदरम्यान खोदला आहे. महाराष्ट्रातला पहिला बोगदा ठाणे ते बीकेसी दरम्यान असून तो ५ किलोमीटर लांबीचा आहे. या बोगद्याचं खोदकाम सप्टेंबर २०२५ मध्ये पूर्ण

झालं होतं. मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प ५०८ किलोमीटर लांबीचा असून बुलेट ट्रेनचा पहिला टप्पा १५ ऑगस्ट २०२७ रोजी सेवेत रुजू होईल असं ते म्हणाले.

**- - -होल्ड - वैष्णव - -**

<><><><><>

इलेक्ट्रॉनिक्स भाग उत्पादन योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात केंद्र सरकारने २२ नवीन प्रस्ताव मंजूर केले असून नवीन वर्षात देशामध्ये ४ नवे सेमिकंडक्टर उत्पादन प्रकल्प सुरु होत असल्याची घोषणा इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज केली. यासंबंधात नवी दिल्लीत आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात आज ते बोलत होते. याच्या आधीही सरकारने २४ प्रकल्पांना मंजुरी दिली होती. या प्रकल्पांमध्ये ४१ हजार ८६३ कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून मोबाईल उत्पादन, दूरसंचार, ग्राहकोपयोगी आणि लष्करी उपयोगाचं इलेक्ट्रॉनिक्स, तसंच माहिती तंत्रज्ञान संबंधित यंत्रसामुग्री उत्पादनाचा यात समावेश आहे. हे प्रकल्प महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, कर्नाटक, हरयाणा, मध्य प्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये सुरु होणार असून यामधून सुमारे ३४ हजार रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

<><><><><>

मराठी विज्ञान परिषदेतर्फे दिले जाणारे जीवन गौरव पुरस्कार आज जाहीर झाले. त्यात डॉ. अनिल काकोडकर जीवनगौरव पुरस्कारासाठी क्षेपणास्त्र क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या डॉ. टेस्सी थॉमस यांची, तर डॉ. रा. वि. साठे जीवनगौरव पुरस्कारासाठी लस संशोधन कार्यात अग्रेसर असणाऱ्या डॉ. गगनदीप कांग यांची निवड झाली आहे.

प्रत्येकी २ लाख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. पुरस्कार प्रदान समारंभ उद्या मुंबईत आयसीटी, अर्थात रसायन तंत्रज्ञान संस्थेत होणार आहे.

<><><><><>

पणन हंगाम २०२५–२६ अंतर्गत किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान आणि भरडधान्य खरेदीसाठी शेतकऱ्यांच्या ऑनलाईन नोंदणीला येत्या ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागानं ही माहिती दिली. यापूर्वी शेतकरी नोंदणीची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ होती.

<><><><><>

घरगुती ग्राहकांसाठी स्वयंपाकाच्या गॅसच्या दारात कोणतेही बदल झाले नसल्याचं तेल आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलिंडर्सच्या किमतींमध्ये एकशे अकरा रुपयांची  वाढ झाली आहे, त्यामुळे घरगुती ग्राहकांनाही वाढीव किंमत द्यावी लागणार, अशा बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यावर विश्वास न ठेवण्याचं आवाहन मंत्रालयानं केलं आहे.

<><><><><>

इंदूरमधल्या भगीरथपुरा इथं दूषित पाण्यामुळे अतिसार होऊन १० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आपल्याला मिळाली आहे, असं इंदूरचे महापौर पुष्यमित्र भार्गव यांनी आज सांगितलं. या भागातल्या पेयजलाचे नमुने अधिक तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.  नळाला लागलेल्या गळतीमुळे पेयजल दूषित झाल्याचा अहवाल एका वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेनं दिल्याचं काल मुख्य आरोग्य अधिकाऱ्यांनी काल सांगितलं होतं. गेले नऊ दिवस या भागातले सुमारे चौदाशे नागरिक उलट्या आणि जुलाब यांनी त्रस्त असल्याचं आढळून आलं आहे .

//<><><><><>//